# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम  **P.S.(ठाणे):** मानोरा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0518  **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/08/2023 01:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिनांक पासून):** 09/08/2023
      **Time Period (कालावधी):** पहर 7  **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/08/2023
      **Time From (वेळेपासून):** 18:55 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 19:19 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 10/08/2023  **Time (वेळ):** 01:10 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 004
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/08/2023 01:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 17 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** ग्राम साखरडोह मानोरा ,मानोरा

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विष्णु चंदुसिंग राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1964

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हमु कल्याण ,कल्याण जि ठाणे ,कोळसेवाडी ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | ग्राम साखरडोह ,मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | ग्राम साखरडोह ,मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870309302

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनंत किसन राठोड | | | 1. ग्राम जोगलदरी ,मंगरुळपीर , मंगरूळपीर,वाशिम,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद पोस्टे मानोरा दिनांक:-10.08.2023माझे नांव - श्री.विष्णु चंदुसिंग राठोड,वय 59 वर्ष ,सेवानिवृत्त-कॅशिअर बेस्ट बृंहमुंबई महानगर

पालीका रा.रिध्दी सिध्दी अपार्टमेंट, बी विंग रुम नं.15, विषाल कॉम्पलेक्स चक्की नाका
कल्याण पुर्व,जि.ठाणे ह.मु. साखरडोह ता.मानोरा जि.वाशिम. मो.नं. 9870309302 (जिओ)

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन माझे मुळ गांव साखरडोह ता.मानोरा जि. वाशिम आहे.दिनांक 31.07.2023 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय वाशिम येथे गेलो असता तेथे मला पोलीस उपअधिक्षक श्री गजानन शेळके व पोलीस निरीक्षक श्री एस.यु.कांबळे लाप्रवि वाशिम हे भेटले यांचेकडे मी माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली असता त्यांनी माझी तक्रार एकुन घेउन दोन सरकारी पंच बोलवले व सदरची माझी तक्रार मला स्वतःचे हस्ताक्षरात दोन सरकारी पंचा समोर लिहीण्यास सांगीतली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर दोन्ही पंच,तक्रारदार म्हणून माझी व पो.नि. श्री एस.यु.कांबळे यांनी सहया केल्या ती तक्रार पुढील प्रमाणे

" मी समक्ष तक्रार लिहुन देतो कि, मी वरील ठिकाणी कुटूबासह राहत असुन बृंहमुंबई महानगर पालीका अंतर्गत बेस्ट येथून कॅशिअर या पदावरुन माहे एप्रिल 2022 मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. माझे मुळ गांव साखरडोह ता. मानोरा जि. वाशिम असुन मी नोकरी निमित्ताने मागील 38 वर्षा पासुन मुंबई येथे राहतो. मौजे साखरडोह येथील स.नं.57 गट नं 48 मधील 6.30 हे.आर शेती ही मुळ मालक श्री.शंकर राजाराम राऊत रा.जवळा खुर्द ता.मानोरा यांचे ताब्यातील जमीन मुळ कुळ धारक नामे हरसिंग हेमला बंजारी (राठोड) रा.साखरडोह ता.मानोरा यांचे ताब्यात सन 1958 पासुन वरील जमीन ताब्यात आहे. त्यांचे मृत्यु नंतर सदर जमीन त्यांचे वारस यांचे ताब्यात असुन ते वहीती करीत आहे.सदर शेतीचा 7/12 हा मुळ मालक श्री.शंकर राजाराम राऊत यांचेच नावाने आहे. त्यामुळे मी व माझा पुतण्या श्री.अमोल तारासिंग राठोड रा.साखरडोह ता.मानोरा यांनी सदर शेतीचा 7/12 हा आमचे नावावर करण्याकरीता व शेतीजमीन मालकिचे सेल सर्टीफिकेट मिळणेकरीता मी पुतण्या अमोल राठोड चे नावाने आवश्यक ती कागदपत्रांसह मा.तहसिल कार्यालय मानोरा येथे रितसर अर्ज दिनांक 21.06.2023 रोजी केला होता.आम्ही दिलेल्या अर्जाच्या प्रकरणात तहसिल कार्यालय मानोरा येथे 2 तारखा झाल्या. सदर प्रकरण आदेशाकरीता प्रलंबित आहे. त्यामुळे आदेश करण्यासंबधाने मी दि.31.07.2023 रोजी तहसिल कार्यालय मानोरा येथील श्री.अंनता राठोड लिपीक यांना कार्यालयात जावुन भेटलो असता त्यानी मला साखरडोह येथील स.नं.57 गट नं 48 मधील 6.30 हे.आर शेतीचे मालकिचे सेल सर्टीफिकेट पुतण्या अमोल राठोड यांचे नावे देण्याकरीता 1,50,000/- रुपयाची मागणी केली आहे. मी मुंबई येथे राहत असल्यामुळे मला नेहमी येणे जाणे षक्य नसल्याने तसेच माझा पुतण्या अमोल राठोड जास्त षिकलेला नसल्यामुळे आम्हाला त्रास होवुनये म्हणुन मी नाईलाजास्तव 1,50,000/- रु देण्याचे कबुल केले आहे. सदर सर्टीफिकेट देण्याकरीता कुठलिही फि लागत नाही.हे मला माहित आहे.

माझी श्री.अंनता राठोड लिपीक तहसिल कार्यलिय मानोरा यांना पैसे देण्याची इच्छा नाही.श्री.अंनता राठोड लिपीक तहसिल कार्यालय मानोरा यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही. श्री.अंनता राठोड लिपीक तहसिल कार्यालय मानोरा यांच्यावर कारवाही करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाही होण्यास विनंती आहे."

सदर तक्रार लिहुन दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री एस.यु.कांबळे यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकॉर्डर चे कार्यप्रणाली बाबत समजावून सांगितले. सदर तक्रारीवरुन दिनांक 01.08.2023 रोजी मला. पंच क्र.1 श्री सागर लहाने यांचेसह लोकसेवक अनंता राठोड,लिपीक तहसिल कार्यालय मानोरा यांचे भेटीकरीता व्हाईस रेकॉर्डर लावुन पाठवून पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये आमच्या भेटी दरम्यानचे संभाषण रेकार्ड झाले आहे.

भेटी दरम्यान माझी गै.अ. अनंता राठोड, लिपीक तहसिल कार्यालय, मानोरा यांचेसोबत भेट झाली. मी त्यांना म्हणालो, तुमच काय आहे ते फिक्स मला सांगा. यावर श्री अनंता राठोड म्हणाले, वसंताभाउचा मला फोन आलता.

मी म्हणालो आले होते, करुन टाक म्हणाले, मी म्हटलं करुन देतो, ते तुमच काय त, मी म्हटलं माझं काही नाही, मी करुन देतो, काही अडचन नाही. यावर मी त्यांना म्हणालो, तुमचा फिक्स अमाउंट काय ते मला सांगा मी त्याचा बंदोबस्त करतो. यावर श्री अनंता राठोड म्हणाले, आम्ही एक करतो, असे वसंताभाउ मला म्हणाले. यावर मी त्यांना म्हणालो, एक लाख. एवढे पैसे सांगीतल्याने मी त्यांना काही पैसे कमी करण्यास विनंती केली. परंतू थोडयावेळाने अनंता राठोड म्हणाले, असं करा सर, सरळ सरळ तुम्ही दिड करा. यावर मी त्यांना म्हणालो, दिड होणार नाही, दिड लाख होणार नाही, दिड खूप होत आहे, खूप होतात, आंगभर झाली माझ्या. यावर श्री अनंता राठोड म्हणाले, करता तुम्ही काय त्यात. नंतर मी त्यांना म्हणालो, चला ठिक आहे तुम्ही सांगीतलं ते मी करतो. यावर अनंता राठोड म्हणाले, करा. असे पडताळणी दरम्यान बोलुन लोकसेवक अनंता राठोड यांनी शेतीचे मालकिचे सेल सर्टीफिकेट माझा पुतण्या अमोल राठोड यांचे नावे देण्याकरीता 1,50,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम ही दोन दिवसानंतर स्विकारण्याची तयारी दर्शवील्याच्या निशपन्न झाल्याने सापळा कारवाई दि.03/08/2023 रोजी आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक 03/08/2023 रोजी सर्वानुमते ठरल्याप्रमाणे सापळा कारवाई करण्याकरीता मला व पंच क्र.01 श्री सागर लहाने यांना पोनि श्री एस.यु.कांबळे लाप्रवि वाशिम यांनी गै अ.अनंता राठोड यांची भेट घेउन लाच रक्कम देण्या करीता रवाना केले. सदर कारवाई दरम्यान गै.अ.अनंता राठोड यांची व माझी तहसिल कार्यालयात भेट झाली. तेव्हा त्यांना लाच रकमेसबंधाने म्हणालो की, हे जर केलं तं एडजेस्ट. यावर ते म्हणाले, नाही ते नंतर. थोडयावेळाने म्हणाले, गै.अं अंनता राठोड मला म्हणाले, तुमच काम मी जास्तीत जास्त 15 मिनिटात फायनल करतो. यावर मी म्हटलं, ठिक आहे. अशी बोलणी झाल्यावर वेळ लागत असल्याने पो.नि.कांबळे साहेबांनी मला परत बालावले. मला विचापुस केल्यावर पो.नि.कांबळे यांनी मला पुन्हा गै.अ.अनंता राठोड यांना भेटण्यासाठी पंच क्र.1 सह पाठविले असता गै.अ.अनता राठोड मला म्हटले हा जो विशय आहे बाकीचा, साहेब तेथूनच जातात तिकडचं तिकडेच होवून जाईल समजा कार्यक्रम. थोडयावेळाने मी त्यांना म्हणालो, जावू का मग मी..? येथे करतच नाही का तुम्ही. नाही, यावर ते म्हणाले, येथे विशयच नाही. अशी बोलणी झाल्यावर मी तेथुन निघुन आलो.

दि.09/08/2023 रोजी मी पो.नि.कांबळे साहेब यांना फोन करुन सांगीतले की, गै.अ.अनंता राठोड हा त्याचे घरी जाता जाता सायंकाळी माझे राहते घरी साखरडोह येथे लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता आहे. असे सांगीतले वरुन दि.09/08/2023 रोजी सायंकाळी पोउपअधि श्री गजानन शेळके,पो.नि.कांबळे,दोन्ही पंच व स्टाफसह माझे गावी साखरडोह येथे आले.त्यानंतर मी गै.अ.अनंता राठोड याला फोन लावला असता त्याने मला सांगीतले की मी डयुटी संपली की साखरडोह येथे येउन भेटतो. त्यानंतर साखरडोह येथे माझे राहते घरी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले.

पो.नि.कांबळे यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र.01 सह माझे घरी थांबण्यास सांगीतल्याने मी घरी असतांना मला गै.अ.अनंता राठोड याचा फोन आला की मी साखरडोहला स्टॅंडवर आलो आहे. त्यावर मी माझा पुतण्या शिवमला गै.अ.अनंता राठोड यास घरी आणण्यास सांगीतल्याने काही वेळातच माझा पुतण्या शिवम व गै.अ.अनंता राठोड माझे घरी आले.मी गैरअर्जदार अनंता राठोड यांना म्हटले पेपर आनले तुम्ही झाले ते त्यावर गै.अ.अनंता राठोड मला म्हणले नाही सर ते तुम्हाला तेथेच येवून सही करावी लागेल. मी गै.अ. अनंता राठोड यांना लाच रकमेला उददेशुन म्हटले हे पहा असे बोलुन मी लाच रकमेची थैली उघडुन त्यांना लाच रक्कम दाखवली. त्यावर गै. अ.अनता राठोड मला म्हटले काही पाहत नाही साहेब. मी त्यांना म्हटले मोजुन घ्या पाहीजे तर यावर गै.अ.अनता राठोड मला म्हटले नाही नाही. असे बोलुन लाच रक्कम मोजली नाही. मी त्याचे जवळ लाचेची रक्कम 1,50,000 /-रु दिली व गै.अ.अनंता राठोड यांनी माझे जवळुन 1,50,000/-रु लाचेची रक्कम कापडी पिशवी सह स्विकारली. गै.अ.अनंता राठोड खुर्चिवर बसलेला असल्या कारणाने त्यांनी ती लाच रक्कम कापडी पिशवी सह त्यांचे मांडीवर ठेवली. त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारले बाबत पो.नि.कांबळे यांना व्हाटसअप वर ईशारा केला असता काही वेळातच पोउपअधि गजानन शेळके,पो.नि.कांबळे व स्टाफ यांनी गै.अ.अनंता राठोड लिपीक तहसिल कार्यालय मानोरा यास लाच रकमेसह रंगेहात पकडले.

दि.09/08/2023 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ.अनंत किसन राठोड वय 34 वर्ष पद महसुल सहायक,प्रस्तुतकार02,अतिरीक्त प्रभार प्रस्तुतकार 01,तहसिल कार्यालय मानोरा,रा.ग्राम जोगलदरी ता.मंगरुळपीर जि. वाशिम यांनी शेत मालकिचे सेल सर्टीफिकेट माझा पुतण्या अमोल राठोड यांचे नावे देण्याकरीता 1,50,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवीली. सापळा कारवाई दरम्यान आज दि. 09/08/2023 रोजी अंदाजे 19.18 वा दरम्यान माझेकडुन 1,50,000/-रुपये लाचेची रक्कम साखरडोह येथिल माझे राहते घरी स्विकारली. म्हणुन माझी गै.अ.अनंत किसन राठोड वय 34 वर्षे पद महसुल सहायक, प्रस्तुतकार02,अतिरीक्त प्रभार प्रस्तुतकार 01,तहसिल कार्यालय मानोरा,रा.ग्राम जोगलदरी ता.मंगरुळपीर जि.

वाशिम यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद पो.ना.योगेश खोटे यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहीली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(एस.यु.कांबळे)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, वाशिम.

सही

( श्री. विष्णु चंदुसिंग राठोड )
रा.साखरडोह,ता.मानोरा
जि. वाशिम

जि. वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHESH NEMCHANDA KUCHEKAR(SI (Sub-Inspector)) / BBPAM8247J **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)